मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे : शेखर सिंह

## 1 ऑगस्टनंतर पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊसपडण्याची शक्यता : आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा

**पिंपरी | प्रतिनिधी**

येत्या गुरुवारी 1 ऑगस्टनंतर पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांनी विशेषतः नदीकाठच्या रहिवाश्यांनी सतर्क राहावे, असा इशारा महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास ती हाताळण्यासाठी महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवा, असे निर्देश आयुक्त सिंह यांनी महापालि का प्रशासनाला दिले.

धरण क्षेत्रात आणि नदीपात्रात अधिक पाऊस पडल्यानंतर पाणी पातळीत वाढ होते. पर्यायाने नदीकाठच्या घरामध्ये पाणी शिरण्याचे प्रसंग उद्भवतात. पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या नद्यांवर असलेल्या धरणांच्या पाणी साठ्यात वाढ झाली असून ते पूर्ण भरण्याच्या स्थितीत आहेत. अशावेळी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग होऊ शकतो. त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाहीनदीच्या पाण्याने धोका पातळी ओलांडण्यापूर्वी नदीकाठच्या रहिवाश्यांना त्याबाबत ध्वनिक्षेपकाद्वा रे सूचना देण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी व्यवस्था करावी, असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले. पूरबाधित नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केल्यानंतर तेथे त्यांना आवश्यक सुविधा, भोजन तसेच वैद्यकीय सेवा आदी बा बींचे नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असल्याची माहितीही सिंह यांनी यावेळी दिली.



### निवारा केंद्राचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिकारी नेमणूक

» निवारा केंद्राचे व्यवस्थापन करण्यासाठी 'अ' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयासाठी उपआयुक्त निलेश भदाणे तर 'क' व 'इ' क्षेत्रीय कार्यालयासाठी उप आयुक्त रविकिरण घोडके यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. 'ब' व 'ग' क्षेत्रीय कार्यालयासाठी उप आयुक्त संदीप खोत यांची तर 'ड' व 'ह' क्षेत्रीय कार्यालयासाठी सहायक आयुक्त तानाजी नरळे यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

### महापालिकेची यंत्रणा सज्ज

» पूरस्थिती निर्माण झाल्यास बचावकार्यासाठी लष्कर (बी.इ.जी.अँड सी., औध मिलिटरी स्टेशन) आणि एनडीआरएफ यांच्याशी समन्वय साधून परिस्थिती हाताळण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महापालिकेची अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून रेस्क्यूसाठी आवश्यक त्या सर्व साधनसामग्रीसह घटनास्थळावर पोहोचण्यासाठी 24 X 7 (24तास 7दिवस) दल सज्ज ठेवण्यात आले, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली

### बारकाईने लक्ष ठेवावे

» शहरात ज्या ठिकाणी गाळ अथवा कचरा साचण्याची शक्यता आहे अशा ठिकाणांची पाहणी करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्त सिंह यांनी संबंधित विभागांना दिले. शहरातील नदीकाठी असणाऱ्या वस्त्यांमध्ये महानगरपालिकेच्या पथकाने विशेषतः रात्रपाळीमध्ये नेमलेल्या पथकाने या परिसरात गस्त घालून बारकाईने लक्ष ठेवावे, अशी सूचना देखील आयुक्त सिंह यांनी दिली.

# पिंपरी-चिंचवड शहरात महापालिका उभारणार संविधान भवन व विपश्यना केंद्र

## भवनाच्या उभारणीसाठी आवश्यक 200 कोटी रुपये रक्कमेच्या तरतुदीसह विविध विषयांना त्यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात संविधान भवन( व विपश्यना केंद्र उभारण्यासाठीच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज मान्यता दिली आहे. या भवनाच्या उभारणीसाठी आवश्यक 200 कोटी रुपये रक्कमेच्या तरतुदीसह विविध विषयांना त्यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी या विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

अनेक दिवसांपासून संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्याची मागणी शहरातील नागरिकांच्या वतीने महापालिकेकडे करण्यात येत होती. या मागणीस अनुसरून संविधान भवन आणि विपश्यना केंद्र उभारणीसाठी 200 कोटी रुपये रकमेच्या तरतुदीस प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे संविधान भवन व विपश्यना केंद्राबाबतची नागरिकांची प्रतीक्षा आता संपली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता नाट्य प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असुन याबाबतच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार महापालिकेच्या 5 शाळांमध्ये हे नाट्य प्रशिक्षण वर्ग भरविण्यात येणार आहेत



### महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी गिरवणार नाट्य अभिनयाचे धडे

» माध्यमिक विद्यालय नेहरूनगर, माध्यमिक विद्यालय रुपीनगर, माध्यमिक विद्यालय थेरगाव, माध्यमिक विद्यालय वाकड आणि माध्यमिक विद्यालय निगडी या विद्यालयांमधील 125 विद्यार्थ्यांना प्रभाकर पवार नाट्य कंपनी यांच्याद्वारे नाट्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या नाट्य वर्गांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रंगमंचावर तालीम आणि सराव करण्याची संधी देखील महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### बैठकीत मंजूर विषय

» महापालिकेच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजन लागू करणे, पिंपळे गुरव येथे आरक्षण क्र.347 बहुउद्देशीय इमारत व क्रीडांगण विकसित करणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आणि कै. ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालयात रुग्ण सेवेच्या दृष्टीने आवश्यक असलेले विविध उपकरणे खरेदी करणे, विविध भागातील रस्ते, नाले, प्रकल्प तसेच शहरात विविध ठिकाणच्या देखभाल व दुरुस्तीच्या विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

# अनधिकृत बांधकामांमुळे पुराचे पाणी शिरले घराघरात

## पुण्याला बर्बाद व्हायला वेळ लागणार नसल्याचा राज ठाकरेंचा इशारा, पुण्यात धरणातून पाणी सोडताना नागरिकांना सूचना द्यायला हवी होती

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात धरणातून पाणी सोडताना नागरिकांना सूचना द्यायला हवी होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येईल, याची नागरिकांना कल्पना नव्हती. त्यात मुळा-मुठा नदीत अनधिकृत बांधकामे झाली आहेत.

पुण्यात धरणातून पाणी सोडताना नागरिकांना सूचना द्यायला हवी होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येईल, याची नागरिकांना कल्पना नव्हती. त्यात मुळा-मुठा नदीत अनधिकृत बांधकामे झाली आहेत. त्या अनधिकृत बांधकामांमुळे पुराचे पाणी घरात घुसले. कोणत्याही कल्पनेशिवाय पाणी सोडल्यानं नागरिकांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे राज्य सरकारनं नागरिकांना मदत करण्याची आवश्यकता आहे. कोणालाही वाऱ्यावर सोडता येत नाही, असं मत राज ठाकरे यांनी मांडलं आहे. टाऊन प्लॅनिंग, महापालिका निवडणूक आणि विविध प्रश्नांवरून मोदींसह शिंदे सरकावर राज ठाकरेंनी टीका केली आहे. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.



### बाहेरुन येणाऱ्यांना फुकट घर

» कुठपर्यंत शहर पसरत आहे, याला मर्यादा नाही. गेले दोन-तीन वर्षे केंद्र सरकार महापालिका निवडणुका घेत नाही. इथे नगरसेवक नाही. त्यामुळे जबाबदारी घेणार कोण? प्रशासनाला कोण बोलणार? प्रशासकीय कारभार चालू असताना, पुराची जबाबदारीसुद्धा प्रशासनाची आहे, असेही राज ठाकरेंनी म्हटले आहे. राज्यात बाहेरून येणाऱ्यांना सरकार फुकट घरे देत आहे. राज्यातील राहणारी लोक भिका मागत आहेत. याला सरकार चालवणे म्हणतात का?" असा संतप्त सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे. प्रत्येकजण आपल्या-आपल्या राज्याचा विचार करतोय. महाराष्ट्राचा कुणी विचार करणार आहे की नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

राज ठाकरे म्हणाले, मुंबई बर्बाद व्हायला वेळ लागला. पुणे बर्बाद व्हायला वेळ लागणार नाही. त्यातच हे चित्र आहे. राज्य सरकारकडून विकासासाठी प्लॅन येतो. पण, टाऊन प्लॅनची गोष्ट नसते. कोणत्याही शहरात टाऊन प्लॅनिंग राबवलं जात नाही. दिसली जमीन की विक एवढा एकचा उद्योग सध्या सुरू आहे. सरकारमधील काहीजण आणि बिल्डरांच्या संबंधांमुळे ही शहरे बर्बाद होत जातील.

### दिसली जागा की...

» शहराचे नियोजन करताना लोकसंख्येनुसार काय सुविधा देणे आवश्यक आहे, याचा विचारच केला जात नाही. शहरात किती गाड्या येतात, त्यांना पार्किंग करायला जागा आहे का, याचा कसलाच विचार केला जात नाही. शहरात रुग्णालय, बागा, उद्याने अशा सुविधाही आवश्यक असतात. याचा विचार न करता सध्या दिसली जागा की विक असा एकमेव धंदा सुरू आहे, अशा शब्दात राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला.

### पुण्यात पाच शहरे

» सध्या पुण्यात एकाच शहरात पाच शहर वसलेली आहेत. पुण्याची वाट झपाट्याने होत गेली. वाढीचा हा वेग अद्भुत आणि विचित्र आहे. सरकारने मागील दोन-तीन वर्षात महापालिकेच्या निवडणुका घेतलेल्या नाहीत. नगरसेवकच नसतील तर शहराची जबाबदारी घेणार कोण? शहरातील कामांबाबत प्रशासनाला जाब विचारणार कोण, असा सवालही ठाकरे यांनी केला.

विकासाच्या वेगवेगळ्या योजना आणणाऱ्या राज्य सरकारचे शहर नियोजनाकडे साफ दुर्लक्ष होत आहे. शहर नियोजन ही राज्य सरकारचा संबंधित विभाग आणि महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने शहरे बकाल होत आहेत. मुंबई बर्बाद व्हायला वेळ लागला. पुण्याला फार वेळ लागणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

पुण्यात उद्भवलेल्या पूरस्थितीचा ठाकरे यांनी आढावा घेतला. पूरग्रस्त भागातील नागरिकांशी संवादही साधला. धरणातून पाणी सोडताना नदीच्या आसपासच्या नागरिकांना आधी पूर्वकल्पना देणे गरजेचे आहे, असे ठाकरे यांनी नमूद केले.

# मार्गदर्शक सूचनांचे पालन केले नसेल तर जलसंपदा अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल : डॉ. नीलम गोऱ्हे

## महापालिका प्रशासनाने बाधित कुटुंबांचे पंचनामे लवकर करून तत्काळ नुकसान भरपाई देण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातू डॉ. नीलम गोऱ्हे यांची माहिती : पूर बाधितांशी संवादन पाणी सोडण्याचा निर्णय स्थानिक विभागातून झाला. मात्र, यामुळे शिवणे, सिंहगड परिसरासह इतरत्र पूर परिस्थिती निर्माण झाली.

याला जबाबदार कोण? धरणातून पाणी सोडताना मार्गदर्शक सूचनांचे पालन केले नसेल, तर जलसंपदा अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल, असे स्पष्टोक्ती विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीकाठी राहणाऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुरबाधित क्षेत्रातील नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात. या भागात स्वच्छता करण्यासोबतच नागरिकांना अन्न, स्वच्छ पाणी देण्याची सोय करावी. या परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करावा. अन्नधान्य खराब झाले असल्यास धान्य वितरणाची सोय करावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरीता पुराच्या पाण्यात खराब झालेले किंवा वाहून गेलेले दाखले, पुस्तके, वह्या उपलब्ध करून द्यावेत. तसेच विद्यार्थ्यांच्या शाळेत तसे कळवावे.



आपत्ती व्यवस्थापनानुसार मदतीची कार्यवाही तत्काळ होणे गरजेचे आहे. बाधित ठिकाणचा चिखल तात्काळ हटवावा त्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करावे. नागरिकांना स्वच्छ पाणी मिळण्याची अडचण येत असेल तर टँकरची व्यवस्था करावी. स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गम बुटांचा पुरवठा करावा. ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले यांना आवश्यक सहकार्य करावे. पुराच्या पाण्यामुळे काही दुकानांचेही नुकसान झाले आहे. त्यांचेही पंचनामे करून नुकसान भरपाईची प्रक्रिया करावी.

डॉ. गोऱ्हे यांनी पाटील इस्टेट येथील पूर बाधितांशी संवाद साधला. त्यानंतर महापालिकेत आयुक्तांसह बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी शिवसेना शहरप्रमुख प्रमोदनाना भानगिरे, जिल्हा प्रमुख रमेश कोंडे यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे लवकर करून त्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशा सूचना देत डॉ. गोऱ्हे यांनी मदतकार्याचाही आढावा घेतला.

### पीएमआरडीएची तक्रार

» पीएमपआरडीए अधिकाऱ्यांना लवळे येथील घटनेबाबत विचारणा केली असता, "आम्ही बांधकाम विभागाचे आहोत, आम्हाला काही माहित नाही' असे उत्तर आले. किती नुकसान झाले, आपत्ती व्यवस्थापन विभाग आहे का याची माहिती विचारली असता, संबंधित अधिकाऱ्यांकडे माहितीच नव्हती.

### डॉ. नीलम गोऱ्हे यांची नाराजी व्यक्त

» अग्निशमन दल सोडता कोणाला माहिती देता आली नाही. त्यामुळे पीएमआरडीएकडे आपती व्यवस्थापन यंत्रणाच नसल्याचे दिसून आले. त्यामुळे येत्या २४ तासात घटनेचा अहवाल देण्याच्या सूचना पीएमआरडीएला दिले. तसेच पीएमआरडीएच्या कारभारावर गोऱ्हे यांनी नाराजी व्यक्त करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

# दहा दिवसांत मिळणार शालेय साहित्य

## सर्व शालेय साहित्याचा दर्जा तपासूनच केले जाणार वितरण : आयुक्त शेखर सिंह यांचे आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा परिपूर्ण लाभ मिळावा आणि शालेय साहित्याचे थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने वितरण करण्यासाठी ई-रुपी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. येत्या १० दिवसांत पालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

प्राथमिक व माध्यमिकच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटपासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीचा अवलंब केला आहे. थेट लाभ हस्तांतरण पद्धती अंतर्गत ई-रुपी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन आयुक्त शेखर सिंह यांचे हस्ते आज पार पडले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक रवींद्र शिंदे यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक अशा एकूण १४० शाळांमधील एकूण ४८ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येत असून १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३ हजार ७०० आणि ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३ हजार ९०० इतका खर्च ई-रुपये क्यूआर कोडच्या माध्यमातून वितरित करण्यात येत आहे.

आयुक्त सिंह म्हणाले, विद्यार्थ्यांना वितरित केल्या जाणाऱ्या शालेय साहित्याच्या दर्जाच्या बाबतीत तक्रारी येत होत्या. त्यावर उपाय म्हणून मागील वर्षापर्यंत शालेय साहित्याची रक्कम थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने पालकांच्या खात्यावर वितरित केली जात होती. त्यातही त्रुटी आढळून आल्याने महापालिकेने शैक्षणिक शालेय साहित्याचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा परिपूर्ण लाभ मिळावा आणि या प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण व्हावी यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धती अंतर्गत ई-रुपी या नवीन कार्य पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच नवीन प्रणाली अंतर्गत देण्यात येणाऱ्या सर्व शालेय साहित्याचा दर्जा महापालिकेने तपासून घेतला असून येत्या १० दिवसांत सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### शालेय साहित्यात या वस्तूंचा समावेश

**» महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या शालेय साहित्यामध्ये दप्तर, बूट, सॉक्स, पीटी बूट,कंपास पेटी, फुटपट्टी, वह्या, स्वाध्यायमाला, प्रात्याक्षिक पुस्तिका, चित्रकला वही, नकाशा पुस्तिका, रेनकोट, स्टीलची पाण्याची बाटली आदी साहित्याचा समावेश आहे. तसेच महापालिकेने निश्चित केल्याप्रमाणे साहित्याचे वितरण व्हावे, याबाबत शालेय स्तरावर सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी केल्या.**

> अधिक वेळ घेऊन महापालिकेने विद्यार्थ्यांची आवश्यक अचूक माहिती संकलित केली आहे. त्यामुळे या नव्या प्रणालीचा परिपूर्ण लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे. प्रशासनात नवीन प्रयोग केल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. शालेय साहित्याचे वितरण करण्यासाठी महापालिकेने अवलंबलेल्या नवीन प्रणालीत भविष्यात येणाऱ्या त्रुटी दूर करून पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना सर्व साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महापालिका**

---

# अधिकारी रस्त्यांवर अन् होर्डिंगधारक पीएमआरडीएत

## मंजुरीबाबत मुदतवाढ देण्याची केली आयुक्तांकडे मागणी : कागदपत्रांची पूर्तता करेपर्यंत कारवाई थांबवण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

अनधिकृत होर्डिंग, बॅनर या विरोधात पीएमआरडीए कडून मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू आहे. सोमवारी देखील सकाळीच मुळशी तालुक्यातील होर्डिंगवर कारवाईसाठी पथक बाहेर पडले. तोच कारवाई थांबून मंजुरीसाठी वेळ देण्याच्या मागणीसाठी जिल्ह्यातील जवळपास ५० हून अधिक होर्डिंगधारकांनी आयुक्तालय गाठले. यावेळी पिंपरी-चिंचवड, पुणे आणि ग्रामीण भागातील देखील होर्डिंगधारक जमले होते.



पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीए क्षेत्रात असलेल्या मुख्य चौक, गर्दी वा वर्दळीच्या ठिकाणी ,जास्त लांबी, रुंदी व उंचीचे, उंच इमारतीवरील कमाल मर्यादेपेक्षा मोठे होर्डिंग आहेत. अनेक होर्डिंगची उंची नियमानुसार अधिक आहे. वाऱ्यामुळे पडून, कोसळून अपघात होण्याची शक्यता लक्षात घेता यावरती कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, आतापर्यंत जवळपास २५ हून अधिक होर्डिंगवर कारवाई केली आहे. त्यानुसार कारवाई थांबण्यासाठी प्राधिकरणामध्ये मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाले आहेत. सद्यस्थितीमध्ये ८८० च्या आसपास प्रस्ताव दाखल झाले आहेत. मात्र तेथील निम्म्याहून अधिक प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत. परिणामी, त्याबाबत पुन्हा कार्यवाही करण्याचे पत्र पाठवले.

दरम्यान, अनेकदा आवाहन करूनही मंजुरीबाबत कार्यवाही केली नाही. त्याचप्रमाणे नियमापेक्षा अधिक उंच असलेल्या होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी सोमवारी सकाळीच पथक बाहेर पडले. तोच पुणे जिल्ह्यातील विविध भागातील होर्डिंगधारकांनी पीएमआरडीए कार्यालयात धाव घेतली. असोसिएशनच्या बॅनरखाली जवळपास ५० ते ७० होर्डिंगधारकांनी आयुक्त कार्यालयाबाहेर गर्दी केली होती. महानगर आयुक्त योगेश म्हसे यांची भेट घेऊन मंजुरीसाठी वेळ मागितली आहे.

याबाबत ॲडव्हर्टायझिंग असोसिएशन ऑफ पुणे आउटडोर यांच्या सदस्यांनी आयुक्तांकडे कागदपत्रांची पूर्तता करेपर्यंत कारवाई थांबण्याबाबत मागणी केलेली आहे. या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष शेखर मते, उपाध्यक्ष महेश घोरपडे, सचिव रमेश सातव, पदाधिकारी अशोक नवले, संतोष गर्जे यासोबतच होर्डिंगधारक उपस्थित होते. या वेळी पंधरा दिवसा मुदत द्यावी, ज्या धारकांनी आपली माहिती कागदपत्रांद्वारे दिली आहे. त्यांना लवकरात लवकर मंजुरी देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली आहे. याबाबत आयुक्त म्हसे यांनी देखील योग्य ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

### विकास व नियमितीकरण शुल्क आकारू नये

**» मान्यताप्राप्त जाहिरात फलकांबाबत, होर्डिंगबाबत छाननी शुल्क त्याचप्रमाणे जाहिरात शुल्क भरण्यास होर्डिंगधारक तयार आहेत. त्यासाठी त्यांनी पुढाकार देखील घेतला आहे. मात्र, याबरोबर लागू करण्यात आलेले विकास शुल्क आणि नियमितीकरण शुल्क आकारू नये, अशी मागणी देखील करण्यात आली. हे शुल्क व्यावसायिकांना न परवडणारे आहे. त्यामुळे याचा सहानुभूतीने विचार करावा, अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली.**

# शहरातील रस्त्यावर 38 लाख वाहनांचा भार!

## पुण्यातील नागरिक पर्यावरणाबाबत अधिक संवेदनशील : सौरऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्यास प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील एकूण वाहनसंख्या २०२४ वर्षाच्या जुलैअखेरपर्यंत ३८ लाख ६३ हजार ८४९ झाली आहे. इलेक्ट्रिक वाहनाच्या खरेदीतही वाढ झाली आहे. वाढती वाहनसंख्या पाहता शहरातील रस्त्यावरचा भार वाढत चालला आहे. परिणामी वाहतूक कोंडीबरोबरच हवा प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत आहे. पीएमपीच्या इलेक्ट्रिक, सीएनजी बसने वायू, ध्वनी प्रदूषणात काही प्रमाणात घट झाली असली तरी २०२३ या वर्षात शिवाजीनगर येथे सर्वाधिक हवा प्रदूषण झाल्याचे आढळून आले आहे. पुणे महापालिकेने यंदाचा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल जाहीर केला आहे. त्यातून ही बाब पुढे आली आहे.



पुण्यातील नागरिक पर्यावरणाबाबत अधिक संवेदनशील होत असून, सौरऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत शहरात इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्ये वाढ झाली आहे. शहरात २०२३ मध्ये २ लाख ९३ हजार ४७१, तर २०२२ या वर्षात २ लाख ५४ हजार ९०७ वाहनांची भर पडली होती. त्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांची संख्या १ लाख ८ हजार ०७३ आहे. बीएस६ वाहनांची संख्या ८ लाख ८० हजार आहे.

### इलेक्ट्रिक, सीएनजी बसने झाली वायू अन् ध्वनी प्रदूषणात घट

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडने आपल्या ताफ्यातील वाहनांचे सीएनजी किंवा इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर करण्यास प्राधान्य दिले आहे. पीएमपीकडे १ हजार ८८७ बस होत्या. त्यापैकी १ हजार १८७ बस सीएनजीवर आहेत आणि ई-बसची संख्या ४७३ आहे. केवळ १२.३ टक्के बस डिझेलवर धावत आहेत. एकूण ताफ्याच्या ८८ टक्के बस स्वच्छ इंधनवर चालणाऱ्या आहेत. इलेक्ट्रिक आणि सीएनजी बसमुळे पुणे शहरातील वायू प्रदूषणाबरोबरच ध्वनी प्रदूषणाची पातळी कमी होत आहे. पीएमपीएमएलच्या ४७३ इलेक्ट्रिक बस मार्च २०२४ पर्यंत एकूण प्रवास चार कोटी किमी पेक्षा जास्त झाला आहे. त्यामुळे अंदाजे सात हजार टन कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे.

### सर्वाधिक हवा प्रदूषणात शिवाजीनगर अव्वल

» पुणे शहरात २०२३ या वर्षात शिवाजीनगरला सर्वाधिक हवा प्रदूषण झाल्याचे आढळून आले आहे. यात पीएम १० चे सरासरी प्रमाण शिवाजीनगर येथे सर्वाधिक नोंदविले आहे. वर्षभरातील ३६५ दिवसांपैकी एअर क्वालिटी इंडेक्स पीएम १० च्या बाबतीत १ दिवस वाईट, पीएम २.५ च्या बाबतीत ३० दिवस वाईट, तर एक दिवस अत्यंत वाईट होते.

### कवडीपाट येथे पक्षाच्या सर्वाधिक प्रजाती :

» पुणे शहराच्या पूर्व भागातील कवडीपाठ या ठिकाणी पक्षाच्या सर्वाधिक २६३ प्रजाती, तर एआरएआय टेकडीवर २५३, पाषाण तलाव परिसरात २३६ प्रजातींचे पक्षी आढळून आले आहेत.

# पुराचा फटका बसल्यानंतर आली महापालिकेला जाग

## नदीपात्रात राडारोडा टाकून पात्र अरुंद केल्याने पाण्याचा फुगवटा निर्माण झाला : नदीपात्रातून काढला 204 डंपर राडारोडा

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून ३५ हजार ५५६ क्युसेकने पाणी सोडल्यानंतर सिंहगड रस्तावरील एकतानगरसह पुलाची वाडी भागात पाणी शिरले. दरम्यान, नदीपात्रात राडारोडा टाकून पात्र अरुंद केल्याने पाण्याचा फुगवटा निर्माण झाला आणि त्याचा फटका सिंहगड रस्ता परिसराला बसला. त्यानंतर जाग आलेल्या महापालिका प्रशासनाने नदीपात्रात टाकलेला राडारोडा काढण्यास सुरुवात केली आहे. सोमवारी दिवसभरात सुमारे २०४ ट्रक राडारोडा काढला आहे. तसेच महापालिकेने जागा मालकांना नोटिसा बजावल्या आहेत.



खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर या राडारोड्यामुळे एकतानगर भागात पाण्याचा फुगवटा निर्माण झाला. सिंहगड रस्त्यावरून येणाऱ्या नाल्याचे पाणीही वस्तीमध्ये घुसले होते. त्यामुळे एकतानगर व परिसरातील अन्य कॉलनीमधील पुराचा धोका कमी करण्यासाठी सोमवारपासून राडारोडा काढण्याचे काम सुरू केले आहे. यात १२ जेसीबी, २५ डंपर यांच्या सहाय्याने दिवसभरात २०४ डंपर राडारोडा काढला आहे. त्यासाठी ३७ ड्रायव्हर, २ कार्यकारी अभियंता, २ उपअभियंता, ६ कनिष्ठ अभियंता याचा समावेश होता.

### भराव टाकून अनेक एकर जमीन केली तयार

राजाराम पूल ते शिवणेदरम्यान मुठा नदीपात्रात खासगी जागा मालकांनी हजारो ट्रक राडारोडा टाकून पात्र बुजविले होते. त्या जागेचा व्यावसायिक वापर करण्याचा हेतू होता. यामध्ये प्रामुख्याने राजाराम पूल ते वारजे पूलदरम्यान जास्त राडारोडा टाकण्यात आला आहे, त्यातून अनेक एकर जमीन निर्माण केली आहे. त्याकडे महापालिका प्रशासनाने सोयीस्कर डोळेझाक केल्याचा आरोप केला जात आहे.

### खाणीत राडारोडा टाकणार

कर्वेनगर, शिवणे, कोंढवे-धावडे आदी भागांत नदीच्या कडेने राडारोडा टाकला आहे. तो राडारोडा नदीपात्रातून काढून जवळच असलेल्या खासगी जागेत टाकला जात आहे. महापालिकेचा वाघोली येथे सी ॲंड डी हा प्रकल्प आहे. येथे राडारोडा नेऊन टाकणे आवश्यक आहे. त्याबाबत उपायुक्त माधव जगताप यांना विचारले असता ते म्हणाले की, 'सध्या नदीपात्रातील राडारोडा काढण्याचे काम सुरू असून, सध्या प्राधान्याने राडारोडा काढून जवळच टाकला जात आहे. त्यानंतर तो वाघोलीतील खाणीत नेऊन टाकला जाईल.

### ठिकाण राडारोडा उचलेल्या डंपरची संख्या

- » कर्वे स्मशानभूमी - १०
- » महालक्ष्मी लॉन्स कर्वेनगर - १५८
- » दांगट पाटील इस्टेट शिवणे - १२
- » राजाराम पूल परिसर - २२
- » दुधाने लॉन्स कर्वेनगर - २
- » एकूण - २०४

" नदीपात्रात भराव टाकून मोकळा भूखंड निर्माण केल्याचे समोर आले आहे. हा राडारोडा काढण्याचे काम महापालिकेकडून केले जात आहे. मात्र ही जबाबदारी जलसंपदा विभागाची आहे. याबाबत जलसंपदा विभागालादेखील सूचना केल्या आहेत. राडारोडा टाकणाऱ्यांना महापालिकेने नोटिसा दिल्या आहेत. एमआरटीपी कायद्याच्या कलम ५२ नुसार संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. नदीसुधार प्रकल्पामुळे पाण्याचा फुगवटा झाल्याचे बोलले जात आहे. या प्रकल्पाला सर्व विभागाच्या परवानग्या आहेत. मात्र त्यानंतरही संबंधित विभागाचा पुन्हा अभिप्राय घेतला जाईल.

**- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**